
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं. क्र. ५९३





# दलितांचा कैवारी भार्गवराम

## श्रीक्षेत्र परशुराम

REFBK-0014292

सन १९६४
क्र- प्रमाण ५५९८६ २२/३/६९
५९३

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : ६३

# दलितांचा कैवारी भार्गवराम

## श्रीक्षेत्र परशुराम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय समृद्धी योजना
१९६७

इथें नांदतो सह्यगिरीवर
कैवारी दलिताचा,
निज परशूनें कद छेदितो
अधर्म-अन्यायाचा !

रामचंद्र चिंतामण ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४२९२
संदर्भ शाखा ठाणे

किंमत
६२
पैसे

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८८ ... ९९३१६९
REFBK-0014292



वोरा अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

श्री : १२२ : २ [७-६४]

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि.

■

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला . १६

■

आवृत्ति दुसरी
शके १८८६
सन १९६४

■

किंमत ६२ पैसे

■

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केन्द्रांचीं
ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं
भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

■

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करिता
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २

■

मुद्रक :
जयंत श्रीधर टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण, पुणें २



# दलितांचा कैवारी भार्गवराम


## श्रीक्षेत्र परशुराम

सह्यगिरीचा वारसा

सह्याद्रि हा मराठी संस्कृतीचा कणा आहे. या अभेद्य पर्वताच्या कुशींतच महाराष्ट्राचें सांस्कृतिक वैभव खुललें-फुललें आणि त्याच्या सुगंधानें या भूमीचा अणु-रेणु दर्वळून गेला. सात-वाहनापासून शिवछत्रपतींपर्यंत जवळ जवळ दोन हजार वर्षांचा महाराष्ट्राचा ज्ञात इतिहास याच पर्वताच्या परिसरांत घडला आहे — महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचें संरक्षण-संवर्धन करणाऱ्या या पर्वताला मराठी लोकमानसांत महनीय स्थान प्राप्त झालें आहे. सह्याद्रीचीं उत्तुंग गिरि-शिखरें हीं मराठ्यांच्या शिव-शक्तीचीं निवास-स्थानें आहेत. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं पांच ज्योतिर्लिंगें याच गिरिवराच्या शृंगांवर विराजमान झालीं असून, तीं या भूमीच्या ज्योतिर्मय जीवनाचीं प्रतीकें बनलीं आहेत. सह्याद्रीनें अत्यंत अभिमानानें, निष्ठेनें व सर्वस्वार्पणाच्या वृत्तीनें महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलक्ष्मीला आपल्या हृदय-कपाटांत सांभाळलें. परशुराम-अगस्तीपासून शिवछत्रपतींपर्यंत — नव्हे, अगदीं विसाव्या शतकांतील लोकमान्य

टिळकांपर्यंत अनेक नरकेसरी या सह्याद्रीच्या गिरिगव्हरांत वाढले आणि त्यांनीं आपल्या असाधारण पुरुषार्थानें या भरतभूमीची प्रतिष्ठा राखली. धर्मासाठीं, न्यायासाठीं आत्मसमर्पणाची सज्जता हा सह्यगिरीचा वारसा आहे.

सह्याद्रीनेंच महाराष्ट्राची अंतर्बाह्य घडण केली आहे. मराठी मनें हीं सह्याद्रीसारखींच उत्तुंग, ज्वलन्त आणि कणखर आहेत. त्यांना विक्रमाचें वेड आहे; परंतु भोगाची चीड आहे. साधीं, उपचारहीन, बाह्यतः कठोर, पण अंतरंगीं मृदु अशीं मनें. अशा मराठी माणसांनीं निर्मिलेलीं देवमंदिरेंहि साधीं-सुधींच आहेत – सोन्यामोत्यांचें वैभव त्यांच्या ठायीं आढळणार नाहीं. काशीच्या विश्वेश्वरासारखी वा मदुरेच्या मीनाक्षीसारखी संपन्नता येथील मंदिरांत नाहीं. सह्याद्रीच्या कुशींतील कोंकणचें परशुरामाचें स्थानहि असेंच साधें-सुधें आहे; बाह्य वैभवाचा तेथें अभाव आहे. परंतु त्या स्थानीं संचित असलेल्या प्रेरणा



परशुराम-मन्दिर एक दृश्य

मात्र ज्योतिर्मय सह्याद्रीच्या रसरशीत अंतरंगाप्रमाणेंच ज्वलन्त आहेत, तेजोमय आहेत, दाहक आहेत.

## अपरान्ताचा स्वामी

वास्तविक परशुराम हा कांहीं मूळचा सह्याद्रीच्या कुशींतला नव्हे. गोदावरीच्या उत्तरेकडे माहूरच्या परिसरांत परशुरामाच्या

पित्याचा – जमदग्नीचा आश्रम होता. भृगुकुळाच्या प्रतिष्ठेचा, नव्हे सर्वस्वाचा विनाश करण्याचा अधम प्रयत्न जेव्हां हैहय कुळांतील सहस्त्रबाहु कार्तवीर्यानें केला, तेव्हां या भार्गवरामानें त्या उन्मत्त आणि अधर्मशील कार्तवीर्याचे सहस्त्र बाहु छेदून त्याच्या सहकाऱ्यांसह त्याचा समूळ उच्छेद केला – पुनः पुन्हा डोकें वर काढणाऱ्या उन्मत्तांच्या समूहाचा निःपात करण्यासाठीं त्यानें आपल्या तीक्ष्ण परशूनें एकवीस वेळां संहारसत्रें साजरीं केलीं. आणि अखेर समुद्रवलयांकित पृथ्वी निष्कंटक बनविल्यावर त्या वीरश्रेष्ठानें कुरुक्षेत्रावर अश्वमेध यज्ञ केला. या यज्ञाची सुवर्णवेदी दहा वांव लांब आणि नऊ वांव रुंद होती. या यज्ञांत महामुनि कश्यप हा 'अध्वर्यु', गौतम हा 'उद्गाता', विश्वामित्र हा 'होता' आणि मार्कंण्डेय हा 'ब्रह्मा' होता. हा यज्ञ म्हणजे परशुरामाच्या ज्वलन्त जीवितकार्याचें आणि त्यागमय हृदयाचें प्रतीक होतें. अधम-संहाराचें कार्य पूर्ण झाल्यावर शस्त्रसंन्यास घेण्यासाठीं त्यानें हा यज्ञ केला होता – आपल्या वैभवप्रदर्शनासाठीं वा भार्गवी साम्राज्याच्या ख्वाहीसाठीं नव्हे. त्याला त्या साम्राज्याशीं, त्या वैभवाशीं, त्या भौतिक सत्तेशीं कांहीं कर्तव्य नव्हतें. त्याला अन्यायावर न्यायाचें, दुष्टतेवर सुष्टतेचें, अधर्मावर धर्माचें प्रभुत्व प्रस्थापित करावयाचें होतें. तें त्यानें केलें आणि यज्ञाची सांगता होतांच त्यानें महामुनि कश्यपाच्या हातावर साऱ्या समुद्रवलयांकित पृथ्वीचें दानोदक सोडलें – अगदीं निर्लोभ वृत्तीनें, दानाचा अभिमान सुद्धां न बाळगतां.

कश्यपालाहि त्या भूमीचा – त्या साम्राज्याचा भोग नको होता. कुणीं तरी समर्थ क्षत्रियानें पुढें यावें आणि न्यायनीतीच्या मर्यादा पाळून, प्रजापालनाचें नि धर्म-रक्षणाचें व्रत सांभाळून हें साम्राज्य चालवावें, हा त्याचा हेतु. पण परशुरामाच्या भयानें

कोणीहि क्षत्रिय पुढें येईना. त्यामुळें सर्वहितबुद्धीनें कश्यपानें परशुरामाला – आपल्या विक्रमशाली शिष्याला आज्ञा दिली : “ माझ्या प्रभुत्वाखालील भूमींत तूं आतां राहूं नकोस – येथून दूर जा. ”

परशुरामानें ती आज्ञा शिरसावंद्य मानली. नर्मदेचा तट उल्लंघून तो सह्याद्रीच्या माथ्यावर आला आणि घाट उतरून पश्चिम सागराच्या तीरीं उभा राहिला. भृगुकच्छापासून कन्याकुमारीपर्यंत पश्चिम सागराचा किनारा ही त्यानें आपली कर्मभूमि मानली. सह्याद्रीच्या वक्षावर आघात करणाऱ्या उन्मत्त सागरालाहि त्यानें आपल्या क्षत्रविजयी परशूची धार दाखविली आणि त्याला सह्याद्रीचे पाय धुवायला लावलें. ही सह्याद्रीच्या पश्चिमेकडील भूमि – ‘अपरान्त’ भूमि परशुरामाच्या प्रभुत्वाखालीं नव्या जीवनाचे, नव्या युगाचे मंत्र जपूं लागली. या भागांत रहाणारे अनार्य वन्य लोक आणि त्यांचे असंस्कृत पुरोहित यांचें नेतृत्व परशुरामाकडे आलें. त्यानें त्यांना शिक्षण दिलें, त्यांच्या मनावर उच्च संस्कृतीचीं सुवर्णपुटें चढविलीं – त्यांना आर्य बनविलें. तो मागासलेल्यांचा पुढारी बनला आणि कोकणची भूमि त्यानें नव्या संस्कृतीची प्रयोगशाळा बनविली.

परशु-धारी भार्गवराम आतां ‘हलायुध’ बनला. अधर्माचे कंठनाल चिरणारा परशुच आतां नांगराचें रूप घेऊन भूमीचें मार्दव वाढवूं लागला. तो परशु आतां जागोजाग वाढलेलीं वृक्षांचीं डांगें कापून शेतांची आंखणी करूं लागला. रक्तांचे पाट वाहविणारे त्याचे बलशाली बाहु आता सह्याद्रीच्या उतरणीवरून वाहणाऱ्या नदी-निर्झरांना अडवून शेतांतून पाण्याचे पाट काढूं लागले. परशुरामाच्या विधायक कर्तृत्वानें अपरान्तांत नवी सृष्टि आणि नवी संस्कृति फुलूं-फुलूं लागली. परशुरामाच्या बाह्यतः कठोर पण अंतर्यामीं हळुवार असलेल्या शुभंकर हृदयाप्रमाणें

कोंकणांत नारळ अवतरला. केळी-पोफळींची लागवड झाली. अपरान्ताच्या नव्या आकांक्षेंतून गगनाला स्पर्श करूं पहाणारे माड उभे राहिले. परशुरामाच्या या कर्तृत्वानें विधात्यालाहि लाजविलें.

भार्गवराम देव उभे कड्यावरी

यामुळें स्वाभाविकच सह्याद्रीच्या पश्चिमेकडील भूमि परशुरामाला देवाधिदेव मानते. जेव्हां कोंकणांत कधीं वरुणाची अवकृपा होते, तेव्हां तेथील शेतकरी या सागर-प्रभूचीच प्रार्थना करतात. जेव्हां कोंकणांत कुणी अन्यायानें धिंगाणा घालायला प्रारंभ करतो, तेव्हांहि तेथील प्रजा दुष्ट-संहारासाठीं परशुरामाचेच पाय धरते. परशुराम हा अनाथांचा नाथ आहे, दलितांचा त्राता आहे आणि अधमांचा संहारकर्ता आहे.

तसें सारें कोंकणच परशुराम-क्षेत्र आहे. परंतु त्यानें प्रथम सह्याद्रीच्या शिखरांपैकीं महेंद्रपर्वतावर उभें राहून सागराला हटविण्याचा विराट् संकल्प केला, तो महेंद्रपर्वतच आज 'पशुराम-क्षेत्र' म्हणून ओळखला जातो. हें स्थान कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूण तालुक्यांत आहे – चिपळूणपासून पायरस्त्यानें दोन मैलांवर व मोटारीनें पांच मैलांवर. चिपळूण आणि परशुराम-क्षेत्र यांच्यामधून वासिष्ठी नदी वाहते. वासिष्ठीच्या उत्तरेस एका टेकडीवर हें स्थान आहे. नदीपलीकडे गोवळकोट किल्ला आहे. तेथून लॉंचमध्यें बसून वासिष्ठीच्या खाडींतून दाभोळ बंदरास जातां येतें. मुंबई, पुणें, कऱ्हाड, रत्नागिरी या ठिकाणांहून चिपळूणकडे थेट जाणाऱ्या मोटारी चालू आहेत. तसेंच मुंबई-गोवा मोटाररस्ताहि येथून जातो.

चिपळूणहून परशुरामाला जाणारी पहिली गाडी अगदीं पहांटे निघते. त्या गाडींत बसून परशुरामाकडे निघालें कीं, उजाडायच्या आंतच परशुरामक्षेत्रीं पोंचतां येतें. हा पांच मैलांचा

मोटारचा प्रवास पहांटेच्या प्रशान्त आणि प्रसन्न वेळीं देवदर्शनाची मनोभूमिका तयार करतो. वासिष्ठीच्या खाडींतील खाऱ्या हवेनें गात्रांवरील निद्रेचें विरल आवरण गळून पडतें आणि रोमरोमांत उत्साह संचरूं लागतो. प्रसन्नतेनें उजळलेल्या मनाच्या गाभाऱ्यांत शब्दावांचून प्रार्थना घुमूं लागते. वाटतें, देवदर्शनाला जाण्याची योग्य वेळ ती हीच !

ज्या बाजूनें डोंगरावर मोटार जाते, त्याच्या दुसऱ्या पालथणांत देवाचें स्थान आहे. मोटारींतून उतरल्यावर देवळाकडे जाण्या-साठीं उतरणीवर एक रुंदशी पाज बांधलेली आहे. देवाचें देऊळ गांवाच्या मध्यभागीं आहे. या गांवाचें मूळचें नांव पेढें. परंतु परशुरामाच्या स्थानामुळें या गांवाला 'परशुरामक्षेत्र' किंवा नुसतें 'परशुराम' असें म्हणतात. गांवाची लोकसंख्या दोन हजारांच्या आसपास आहे. गांवांतील बहुतेक वस्ती मराठ्यांची असून पन्नास-एक घरें ब्राह्मणांचीं आहेत. गांव उंचीवर असल्यामुळें हवा निरोगी आहे. जांभ्या दगडामुळें पाणी गोड आहे. गांवाच्या परिसरांत विपुल वनराजी आहे. गांव अगदीं प्रसन्न आणि निर्मळ आहे. देवळाकडे जातांना घरांच्या अंगणांत नांदणारी कोंकणची संस्कृति मनाला भुरळ पाडते – परशुरामाच्या हृदयाची आठवण करून देते. प्रत्येक घरापुढें प्रशस्त अंगण – स्वच्छ आणि सारवलेलें. अंगणांत गृहिणीच्या आंतरिक पावित्र्याची आणि त्यागाची साक्ष देत उभें असलेलें तुळशी-वृंदावन. एका बाजूला जाई-जुई-अबोलीचा गंधमय समूह. घराभोंवतालच्या गडग्याबाहेर वेळूंचीं बनें आकाशाला खुणावीत आणि वाऱ्याबरोबर आंदोळत उभीं असतात. लिंबिणी, पपनसें, केळीं, पोफळी, नारळ आणि फणस यांचीहि जागोजाग उपस्थिति. किती मधुर आणि रसाळ परिसर तो. आणि तोहि रेताड-खडकाळ भूमींतून फुललेला.

पाषाणालाहि चैतन्याची पालवी फोडणारी किमया या भूमींत, या परशुराम-भूमींत नांदत आहे, याची जाणीव मनाला भारावून टाकते.


ही क्षेत्रपरिसरांतली किमया अनुभवीत आपण गावाच्या मध्यभागीं असलेल्या देवळाकडे जाऊं लागलों कीं, एखादी गृहिणी तुळशीला पाणी घालतांना मनाशींच गातांना आढळेल —

भार्गवराम देवाजींची । पायठणी अवघड ।
येथून पाया पड । गोपूबाळा ॥
वाजंत्री वाजती । बाणगंगेच्या धक्क्यावरी ।
परशुराम सख्यावरी । अभिषेक ॥
भार्गवराम देव । उभे कड्यावरी ।
निळ्या घोड्यावरी । स्वार झाले ॥
अक्षयतृतीयेला । उदककुंभ द्यावा ।
मनात स्मरावा । भार्गवराम ॥
अक्षयतृतीयेला । जन्मले परशुराम ।
मातेला मारुनी । पुरविती पितृकाम ।
एकवीस वेळां । निःक्षत्री केली धरणी ।
अद्भुत वाटे करणी । परशुरामाची ॥

परशुरामाच्या 'अद्भुत करणी'चें नित्य स्मरण राखणाऱ्या त्या गृहिणींच्या सहजगीतानें आपली श्रद्धा उत्फुल्ल होते; दर्शनाची ओढ तीव्र होते. पन्नास-साठ शतकांनंतरहि ज्याची विक्रमस्मृति या भूमीनें उरीं सांभाळली आहे, त्याच्याविषयींच्या भक्तिभावानें हृदयाचा कुंभ ओसंडूं लागतो.

देवालयाचा पसारा तसा बराच आहे. नगारखान्याखालच्या पूर्वाभिमुख महाद्वारांतून प्रवेश केल्यावर मंदिराभोंवतालचा प्रशस्त


प्राकार दृष्टीस पडतो. उत्सवाचा दिवस नसेल तर आंत सर्वत्र शांत वातावरण असतें – क्षत्र-संहारानंतर पृथ्वीचें दान करून महेंद्र-गिरीवर विसांवलेल्या परशुरामाच्या निःस्तब्ध हृदयासारखें. मुख्य मंदिराभोंवतीं खूप मोकळी जागा सोडून कोट बांधलेला आहे आणि त्या कोटाला मुख्य दिशांस दारें आहेत. सभामंडप, मध्यगृह आणि गर्भ-गृह असे मंदिराचे तीन भाग आहेत. मंदिर हेमाडपंती बांधणीचें असून अगदीं साधें आहे– त्यावर कसलीहि कलाकुसर नाहीं वा



परशुराम-मंदिर आणखी एक दृश्य

कृत्रिम सजावटहि नाहीं. मंदिराच्या तीनहि भागांवर घुमटया असून त्यांचे कळस क्रमानें उतरते होत आलेले दिसतात.

सोळखांबी सभामंडप आणि मध्यगृह ओलांडून गाभा-ऱ्याच्या दारांत उभें राहिलें कीं, समोर तीन मनोहर पाषाणमूर्ति डोळ्यांची धर्णा पुरवितात. या ओळीनें उभ्या असलेल्या तीन मूर्ति कंबरेइतक्या उंचीच्या आहेत. तीनहि मूर्ति चतुर्भुज असून सायुध आहेत. मधली सर्वांत उंच मूर्ति परशुरामाची असून डावी-उजवी-कडे अनुक्रमें काल आणि काम यांच्या मूर्ति आहेत. वास्तविक काल-काम हे विश्वेदेवांपैकीं आहेत. त्यांची परशुरामाशीं सांगड कशी घातली गेली, कुणास ठाऊक! परशुरामाच्या चार हातां-पैकीं उजवीकडचा खालचा हात अभयदानाच्या मुद्रेत असून



मंदिरातील मूर्ति : काल, परशुराम आणि काम

उरलेल्या तीन हातांत अनुक्रमें बाण, धनुष्य आणि परशु अशीं तीन आयुधें आहेत.

या मूर्तींची स्थापना माघ शुद्ध ६ शके १७०१ या दिवशीं झालेली आहे. त्यापूर्वी मंदिरांत मूर्ति नव्हत्या; केवळ शिलासनाची पूजा होत असे. या मूर्ति गुहागरचे श्री. परचुरे यांनीं पुण्याहून कुणा वेंकतराम नामक शिल्पकाराकडून तयार करवून आणल्या. त्याच वेळीं रेणुका, गंगादेवी आणि गणपति यांच्यांहि मूर्ति स्थापिलेल्या आहेत.

परशुराम-मूर्तीचें आजचें दर्शन सौम्य आहे—प्रसन्न आहे. माहिष्मतीच्या युद्धभूमीवर हैहय कुळाचे कंद छेदणाऱ्या वा कुरुक्षेत्रावर रिपु-रुधिरानें पितरांचें तर्पण करणाऱ्या रुद्र भार्गवाची भीषणता या मूर्तींत नाहीं. पण तरीहि—त्या सौम्य-शांत मुखमंडलाचें दर्शन घेत असतांहि तो सारा भीषण इतिहास मनांत

जागा झाल्याशिवाय रहात नाहीं. पहातां पहातां वर्तमानाचा विसर पडतो — मन पांच हजार वर्षांपूर्वीच्या वातावरणांत पोहोंचतें — जमदग्नीच्या आश्रमांत डोकावूं लागतें.

### अधर्मांचा वैरी आणि दलितांचा कैवारी

परशुरामाचें भृगुकुळ ऋग्वेद-काळापासून प्रसिद्ध आहे. या कुळांत भृगु, च्यवन, शुक्र, दधीच, और्व, ऋचीक इत्यादि अनेक तेजस्वी तपोनिधि होऊन गेले. नर्मदेच्या परिसरांतील माहिष्मतीच्या हैहयकुलीन बलशाली राज्यकर्त्यांचें भृगूंशीं वैर होतें. वास्तविक यांत भृगूंचा कांहींच दोष नव्हता — हो, होता तो स्वाभिमानी, न्यायप्रिय, स्वातंत्र्यनिष्ठ वृत्तीचा! परशुरामाचा प्रपितामह और्व याच्या काळापासूनच भृगूंच्या मनांत हैहयांच्या अधम वृत्तीविषयींचा क्रोध धुमसत होता. संयमाचे प्रस्तर फोडून बाहेर पडण्यासाठीं तो लाव्हारस उसळ्या मारीत होता.

हैहय कुळांतील सहस्रबाहु कार्तवीर्य आणि परशुरामाचा पिता जमदग्नि हे समकालीन. नर्मदेच्या उत्तर तीरावरील माहिष्मती नगरी ही कार्तवीर्याची राजधानी होती. त्याचें साम्राज्य नर्मदेच्या मुखापासून हिमालयाच्या पादप्रदेशापर्यंत पसरलें होतें. या साम्राज्य-प्रभुत्वामुळें कार्तवीर्याचा विवेक ढासळला. तो उन्मत्त बनून देवा-ब्राह्मणांचा अपमान करूं लागला. समाजाचें नैतिक नियंत्रण करणाऱ्या तपोनिधींचे आश्रम उद्ध्वस्त करूं लागला; निष्पाप ऋषींच्या पर्णकुटींतून स्त्रिया आणि गाई पळवून नेऊं लागला.

या उन्मत्त कार्तवीर्यानें एके दिवशीं प्रत्यक्ष जमदग्नीच्या आश्रमांतून कामधेनु पळवून नेली — अगदीं अन्यायानें, जबर-दस्तीनें. परशुराम या वेळीं तपश्चर्येसाठीं दूर गेलेला होता. परत आल्यावर जेव्हां त्याला हें वृत्त समजलें, तेव्हां तो तडक बाहेर पडला आणि कार्तवीर्याचा त्याच्या प्रचंड सेनेसह धुव्वा उडवून त्यानें

कामधेनु सोडवून आणली. या युद्धांत परशुरामानें कार्तवीर्याचे सहस्र बाहु छेदून अखेर त्याला आपल्या परशूनें कंठस्नान घातलें. त्याचें शंभर अक्षौहिणी सैन्यहि परशुरामाच्या वेगवान् बाणांना बळी पडलें.

यानंतर परशुराम पुनः तपाला निघून गेला. परंतु अर्धवट ठेचलेल्या सापांची वळवळ पुनः सुरू झाली. युद्धांतून पळून गेलेले कार्तवीर्याचे कांहीं पुत्र आणि सामंत परशुरामाच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन पुनः जमदग्नीच्या आश्रमांत शिरले आणि त्या नराधमांनीं त्या ध्यानस्थ ऋषीवर अनेक आघात करून अखेर त्यास असावध अवस्थेंत ठार केलें.

आपल्या पित्याच्या निर्घृण हत्येची वार्ता वायुवेगानें परशुरामाच्या कानीं गेली. तो तडक आश्रमांत आला. हृदय फाटून जावें असें तें दृश्य! एकवीस जखमांनीं रक्तलांछित झालेलें जमदग्नीचें प्रेत आणि शोकानें ऊर बडवून घेणारी रेणुका. परशुराम क्रोधानें लाल झाला. पित्याच्या एकवीस जखमा पाहून – एका निष्पाप आणि स्वार्थहीन ऋषीचा वध करण्यासाठीं शस्त्रें वापरणाऱ्या त्या क्षत्रियाधमांची ती क्रूरता पाहून परशुरामानें घोर प्रतिज्ञा केली :

"मी एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करीन."

ज्यांनीं प्रजेचें पालन करायचें, धर्मसंरक्षक तपोनिधींना संरक्षण द्यायचें आणि न्याय-नीतीच्या सुरक्षिततेसाठीं आपलें बल वापरावयाचें, त्यांनींच हा अत्याचार मांडल्यावर दलितांचा त्राता कोण? परशुरामानें तें व्रत स्वीकारलें. गोदावरीच्या उत्तर तीरावर त्यानें गांजलेल्या दलितांची संघटना उभारली आणि प्रथम हैहय कुळाचें निर्मूलन करून, हैहयांना साथ देणाऱ्या सर्व दुष्टांचें दमन केलें.

परशुरामानें दुष्ट-संहाराचीं अशीं एकवीस सत्रें साजरीं केलीं. शत्रू निर्वीर्य झाले. अनेक ऋषींनीं परशुरामाची समजूत घातली आणि त्याला शस्त्र खालीं ठेवण्याची विनंती केली. परशुरामालाहि युद्धाचा हव्यास नव्हता – रक्ताची तहान नव्हती. त्याला केवळ अन्यायाचें परिमार्जन करायचें होतें; दुष्टतेचें दमन करायचें होतें. तो हेतु सफल झाल्यावर त्यानें कुरुक्षेत्रावर कश्यप-मुनींच्या साक्षीनें शस्त्र खालीं ठेवलें आणि सह्याद्रीच्या कुशीचा आसरा घेतला.

– परशुरामाचें दर्शन घेत असतांना हा सारा भीषण इतिहास आठवतो. आजहि त्याच्या हातांतील तीं शस्त्रें पाहून आपल्या मनाला विश्वास वाटतो. त्याचा तो अभयकर आणि तीं तीन हातांतील शस्त्रें म्हणजे निरपराध्यांच्या संरक्षणाची नि अधमांच्या निर्दालनाची प्रत्यक्ष ग्वाहीच आहे. सह्याद्रीच्या शिखरावर उभा राहून आल्यागेल्या यात्रिकाला – नव्हे उभ्या विश्वाला परशुराम जणुं गर्जून सांगत आहे :

“ आर्तत्राणाय व. शस्त्रं न प्रहर्तुमनागसि ! ”


आमचें शस्त्र आर्तांच्या त्राणासाठीं आहे,
निरपराध्यांवर आघात करण्यासाठीं नव्हे !

हेंच परशुरामाचें अवतारकार्य. परशुराम चिरंजीव आहे – तो गेलीं पांच हजार वर्षें सह्याद्रीच्या सुपुत्रांचें सत्त्वपोषण करीत आहे !

**मंदिराच्या अवतीं-भोंवतीं :**

परशुरामाचें दर्शन घेऊन आणि मध्यगृहांतलें देवाचें शेज-घर पाहून प्रदक्षिणेसाठीं चालूं लागल्यावर प्राकारांत आणखीहि कांहीं मंदिरें दिसतात. सभा-मंडपाच्या समोर मारुतीचें मंदिर आहे. परशुरामाच्या डाव्या बाजूस म्हणजे उत्तरेस गणेश-मंदिर आहे. येथें

गंगादेवी आणि उजव्या सोंडेचा गणपति अशा दोन सुंदर संगमरवरी मूर्ति आहेत. परशुरामाच्या मागें आपल्या पराक्रमी पुत्राचें कौतुक करण्यासाठीं रेणुका उभी आहे. रेणुकेचें मंदिर हेमाडपंती बांधणीचें असून त्याच्या बाह्य स्तंभांवर कांहीं चित्रें कोरलेलीं आहेत. मुख्य मंदिराच्या डाव्या बाजूलाच प्राकारांत 'बाणगंगा' नांवाचें तीर्थकुंड आहे. या कुंडाचा आकार लंबचौकोनी आहे. परशुरामानें भूगर्भांत बाण खोचून ही 'बाणगंगा' निर्माण केली अशी जनश्रुति आहे. कुंडांतील तळाचा शोध घेतला तर तळाशीं पांच बाण-रंध्रें दिसतात. विराजीपंत नामक ब्राह्मणानें एका मैलावर असलेल्या 'सवतसडा' या ओढ्यांतून चिरेबंदी पाट बांधून बाणगंगेंत पाणी आणून सोडलें आहे.



रेणुका-मंदिर

परशुराम-मंदिरापासून दोन फर्लांगांवर एका टेकडीवर दत्तात्रेयाचें मंदिर आहे. या मंदिराच्या वाटेवर श्री. आबा जोशी यांनीं बांधलेली एक मोठी विहीर आहे. या विहिरीपासूनहि एक पाट काढून बाणगंगेंत पाणी सोडलेलें आहे. ऐन उन्हाळ्यांत होणाऱ्या परशुराम-जन्मोत्सवांत या विहिरीचा फार उपयोग होतो. दत्तात्रेयाच्या स्थानाचा परिसर निसर्गरम्य आहे. येथून दूरवरचा प्रदेश दृष्टिपथांत येतो आणि सह्याद्रीच्या वैभवानें डोळे दिपून

जातात. येथें डोंगरांत पांच गुहा आहेत. ज्या गाईनें आपल्या कासेंतील दुधाचा नित्य अभिषेक करून परशुराम-स्थानाचा शोध लावला, त्या गाईचें मंदिर चिपळूण-परशुराम पायवाटेवर कोष्टेवाडींत आहे.

वाणगंगेला पाणी पुरवणाऱ्या 'सवतसड्या'विषयीं एक स्थानिक दंतकथा आहे : या गांवांतील एका घरच्या दोघी सवती एकमेकींचा अत्यंत द्वेष करीत. एकदां त्या या ओढ्यावर कांहीं निमित्तानें आल्या. ओढ्याच्या कांठीं बसून वरकरणी प्रेमानें थोरली धाकटीची वेणी घालूं लागली. पण वेणी घालतांना थोरलीचा हात कांपत आहे हें पाहून धाकटीला संशय आला आणि तिनें आपल्या पदराची नि तिच्या ओच्याची गांठ बांधली. थोरलीनें वेणी घालतां घालतां काळ्या कड्यावरून कोसळणाऱ्या ओढ्यांत धाकटीला ढकलून दिलें – आणि 'द्वेषाच्या गांठी'नें अखेर दोघींचाहि बळी घेतला.

अमृताचा अभिषेक

सहा शतकांपूर्वींची गोष्ट. एक गाय या ठिकाणीं एका पाषाणावर नित्य नियमानें पान्हा सोडूं लागली. त्या अमृताच्या अभिषेकानें तो कृष्णपाषाण रोज न्हाऊन निघूं लागला. हा चमत्कार पाहून गुराखी मुलें आश्चर्यचकित झालीं – त्यांनीं हें 'नवल' वडीलधाऱ्या माणसांना कळविलें. कुणालाहि या दैवी गूढाचा अर्थ कळेना. अखेर एका श्रद्धावंताच्या स्वप्नीं रिघून परशुरामानें सांगितलें : "मी इथें सुप्त स्थितींत आहें – मला जागृत व्हायचंय्." तेव्हांपासून त्या विशिष्ट भूखंडाची 'परशुराम' म्हणून पूजा-अर्चा होऊं लागली.

यादवांचें राज्य नष्ट होऊन सह्याद्रीच्या परिसरांत अधर्म-अन्यायाचें तांडव सुरू झालेलें पाहून तो निराकार चिरंजीव

आकार धरूं पहात होता काय? ऋषींच्या आश्रमांतील निष्पाप धेनूंचा आणि सत्त्वशील साध्वींचा अपहार करणाऱ्या हैहयां-प्रमाणेंच तत्कालीन म्लेंछांचें दुर्वर्तन पाहूनच ती धेनु परशुरामाला जाग आणण्यासाठीं अमृताचा अभिषेक करीत असावी. तसेंच असावें. कारण त्या परशुराम-भूमिवर मंदिर उभारलें गेलें, तें एका भयभीत यवन स्त्रीकडून.

बेगमेचा नवस

इ. स. १४०० च्या सुमारास आदिलशहाच्या बेगमेचीं तारवें पश्चिम समुद्रांत वादळानें बेपत्ता झालीं. या संकटानें ती यवन स्त्री हताश झाली. अपरान्ताचा स्वामी आणि पश्चिम समुद्राचा शास्ता जो परशुराम त्याला तिनें नवस केला: "माझीं तारवें तीराला लागूं देत – मी हातांतील एक कंकण लावून तुझें देऊळ बांधीन." परशुराम-कृपेनें तिचीं तारवें सुरक्षितपणें किनाऱ्याला लागलीं. तिनें मग हातचें कंकण मोडलें आणि दाभोळहून गलबतांतून काळे दगड आणवून त्या पवित्र भूखंडावर परशुरामाचें मंदिर उभारलें. तिनें मंदिरासमोर पूर्वेच्या टेकडीवर एक दीपमाळहि बांधली. या दीपमाळेच्या बांधणींत दिशासाधन केलें आहे. कार्तिकी पौर्णिमेच्या रात्रीं शिवाच्या त्रिपुरविजयाची आनंदस्मृति साजरी करण्यासाठीं या दीपमाळेवर दिवे उजळले कीं, त्या दीपज्योतींचा प्रकाश या शिवभक्त भार्गवाच्या मुख-मंडळाला उजळून टाकतो.

दोन परशुरामांची भेट

श्रीशिवछत्रपतीहि राज्याभिषेकापूर्वीं श्रीपरशुरामाच्या दर्शनासाठीं आले होते. बखरकार लिहितात: "श्रीशिवाजी महाराज श्रींचे दर्शनास आले ते समई गोविंद जोशी बिन अनंत

जोशी परशुरामकर यांनीं पूजा सांगोन तीर्थ-उपाध्येपण देऊन पाऊणशें होनांची सनद करून दिली. ” सह्याद्रीचा हा महान् सुपुत्र अधर्म-निखंदनाचें आणि धर्मसंस्थापनेचें पवित्र कार्य पूर्ण करून श्रीपरशुरामाचा आशीर्वाद मागायला आला होता. महाराष्ट्राच्या स्वराज्याला नि स्वातंत्र्याला त्या विरागी वीराचें वरदान हवें होतें. श्रीपरशुरामाचीच परंपरा श्रीशिवछत्रपतींनीं चालविली होती. सह्याद्रीच्या आश्रयानें अधमांना शासन करणारे आणि दलितांचें उत्थान घडविणारे हे दोन महापुरुष सर्वांशानें एकाच हृदयाचे होते. सह्याद्रीच्या कड्याप्रमाणें त्यांच्या न्यायनिष्ठा अभंग होत्या आणि कृष्णा-गोदेच्या जळराशीप्रमाणें त्यांच्या भावना आर्द्र होत्या. एका सुविख्यात पंडितानें या दोन महापुरुषांतील साधर्म्य यथार्थपणें वर्णिलें आहे : “ शिवाजीचा जन्म वैशाख शुद्ध द्वितीयेचा आणि परशुरामाचा वैशाख शुद्ध तृतीयेचा. तिथिक्षय झाला तर दोघांच्याहि जयंती एकाच दिवशीं येतात. दोघेहि मातृभक्त. दोघांच्याहि स्त्रियांना उन्मत्तांचा उपसर्ग कमीअधिक प्रमाणांत पोंचलेला. दोघेहि शंकराचे भक्त. दोघांनाहि पुरुषप्रकृतीपासून दिव्य अस्त्रें प्राप्त झालीं. दोघेहि एकाच दुर्गाश्रयी युद्धपद्धतीचे पुरस्कर्ते; दलितांचे उद्धारक, उन्मत्तांचे उच्छेदक, साम्राज्यांचे विध्वंसक, स्वातंत्र्याचे संस्थापक आणि अपरान्ताचे स्वामी. दोघांनींहि सागराला जिंकलें. जिंकलेली पृथ्वी परशुरामानें कश्यपाला दान दिली आणि शिवाजीनें रामदासाला. आणि दोघांचींहि निवास-स्थानें सह्याद्रींत ! ”

श्रीपरशुरामाच्या मूर्तीकडे पहातां पहातां ही साधर्म्याची जाणीव हळूहळू तीव्र होत जाते आणि समोरची परशुराम-मूर्तिच श्रीशिवछत्रपतींचें रूप धारण करून मनश्चक्षूंपुढें अवतरते. या भावनेच्या चमत्कारांतूनच परशुरामाच्या चिरंजीवित्वाचा अर्थ

उमलून येतो. या सह्यगिरीच्या परिसरांत स्वातंत्र्यनिष्ठेच्या आणि अधर्मनिर्दालनाच्या रूपानें परशुराम निरंतर नांदत आहे – तो इथें या सह्यगिरीच्या माथ्यावर चिरंजीव होऊन राहिला आहे – हीं सारीं उत्तुंग सह्यशिखरें म्हणजे जणुं अधमांना असह्य ठरलेल्या त्याच्या तीक्ष्ण परशूचींच प्रतीकें आहेत. या जाणिवेनें भारावलेलें आपलें मन आपोआपच त्याचें गौरवगीत गाऊं लागतें –

इथें नांदतो सह्यगिरीवर कैवारी दलिताचा,
निज परशूनें कंद छेदितो अधर्म-अन्यायाचा !

ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर

विजापूरच्या बेगमेनें उभारलेल्या लहानशा मंदिराची वाढ शिव-कालांत होऊं शकली नाहीं. मंदिरांचें व राजगृहांचें वैभव वाढविण्याचा तो काळच नव्हता. सह्याद्रीच्या गडकोटांचा आश्रय घेऊन आणि अभेद्य निष्ठेचे दुर्ग सर्वत्र उभारून महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यलक्ष्मीचें प्राणपणानें रक्षण करणें, हेंच शिवकाळांतील प्रधान कर्तव्य होतें; तीच खरी परशुरामाची पूजा होती.

इ. स. १६८० मध्यें शिवछत्रपतींचें निधन झालें. त्यानंतर अंतर्बाह्य संघर्षांशीं सतत झगडत राहिलेला छत्रपति संभाजी इ. स. १६८९ मध्यें औरंगजेबाच्या हातून मारला गेला आणि महाराष्ट्रांत यवनांचा जोर पुनश्च वाढूं लागला. अशा ऐन धामधुमीच्या काळांत परशुरामाच्या सान्निध्यांत एक नवा निष्ठावान् भक्त अवतरला. या नव्या भक्ताचें नांव ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर.

यांचें जन्मगांव वऱ्हाडांतील दुधेवाडी हें खेडें. मातापित्यांचें वृद्धापकाळांतील एकुलतें एक अपत्य. मूळ नांव विष्णु. विष्णूनें गांवाशेजारच्या राजुरी या गांवांतील गणपतीची आराधना केली आणि श्रीगणेशाचा कृपाप्रसाद प्राप्त केला. नंतर विष्णूनें संसारांत

मी इथें तुझें मंदिर बांधीन—तुझी पूजा करीन. ” स्वामींचा डोळा बरा झाला आणि इथें रेणुका-मातेचें मंदिर उभें राहिलें. दूरच्या टेकडीवरचें दत्तमंदिरहि स्वामींनींच बांधलेलें आहे.

देवस्थानाचा हा सर्व पसारा वाढवीत असतांनाच त्यांनीं या ठिकाणीं नित्य पूजोपचारादि व्यवस्था पहाण्यासाठीं सेवेकरी आणविले. स्वामींच्या कर्तृत्वाच्या आकर्षणानें येथें वस्तीहि वाढली. मंदिरांची बांधणी पूर्ण झाल्यावर स्वामींनीं देवाचा उत्सव केला आणि त्या उत्सवाच्या वेळीं तोफांचे आवाज काढले.

परंतु तोफांचे हे आवाज म्हणजे परशुरामाच्या जागृतीची साक्ष ठरली—तोफांच्या मुखांतून परशुरामाचा जो शत्रुंजयी हुंकार प्रगटला, त्या हुंकारानें शेजारचा गोवळकोटचा हबशाचा सुभेदार सिद्दीसात अस्वस्थ झाला. देवाधर्माशीं ज्यांचें वांकडें, न्यायनीतीशीं ज्यांचें वैर, त्यांना हें देवाचें चढतें-वाढतें वैभव सहन होणें अशक्य होतें. सिद्दीसात मनोमन स्वामींचा द्वेष बाळगून जळूं लागला. परंतु स्वामींना सरळ विरोध करणें कठीण होतें. स्वामी छत्रपति आणि पेशवे यांचे गुरु होते—मराठी राज्यांत त्यांच्या नांवाला मोठी प्रतिष्ठा होती. रणधुरंधर बाजीराव आणि चिमाजी-अप्पा हे दोघेहि आपल्या यशाचें रहस्य स्वामींच्या कृपेंत आहे असें मानीत होते. परंतु तरीहि तो स्वामींवर—त्यांना प्रिय असलेल्या परशुरामक्षेत्रावर आघात करण्याची संधि पहात होता; वर वर गोडी-गुलाबीनें रहात होता.

एकदां स्वामी कर्नाटकांत भिक्षेला निघाले असतांना त्यानें स्वामींना विनंती केली कीं, “ सावनूर-बंकापूरच्या नबाबानें मला भेट दिलेला हत्ती आपण परत येतांना बरोबर घेऊन यावा. ” स्वामींनीं त्याच्या विनंतीनुसार हत्ती बरोबर आणला. परंतु सावड्यांजवळ हत्तीसह स्वामींचा लवाजमा येतांच तेथें हबशी आणि

आंग्रे यांच्या चौकीवरील सैन्यांचा संघर्ष झाला आणि आंग्र्यांनीं हत्ती पळविला. या वेळीं स्वामी मागच्या मुक्कामावर कांहीं धर्मकृत्यांत गुंतले होते.

सिद्दीसातानें मात्र या घटनेवरून अशी शंका घेतली कीं, स्वामींनीं मुद्दामच जातीला मिळून माझा हत्ती आंग्र्यांच्या स्वाधीन केला. त्याच्या धुमसत्या द्वेषाला एवढें निमित्त पुरेसें होतें. त्यानें शिवरात्रीच्या दिवशीं परशुरामक्षेत्रावर हल्ला करून सेवेकऱ्यांना निर्दयपणें मार दिला आणि मंदिरांत व गांवांत लूटमार करून परशुराम गांवांतील सर्व खोतांना व रयतेला पकडून नेलें. स्वामी स्वस्थ बसले नाहींत. ते तडक दंडाराजपुरीस गेले. हबशीच्या समोर उभे ठाकले. तो भला माणूस होता. त्यांची निर्भय मूर्ति पाहून तो चकित झाला आणि त्यानें सर्वांना मुक्त करून परशुराम गांव देवाला इनाम दिला.

परंतु झालेल्या घटनेमुळें सिद्दीसातानें सूडाचा पीळ अधिक घट्ट केला आणि तो वारंवार स्वामींना त्रास देऊं लागला. शेवटीं स्वामींनीं त्याच्या त्रासाला कंटाळून कोंकण सोडलें आणि देशावर धावडशी हें गांव आपलें कायमचें निवासस्थान बनवलें. अर्थात् परशुरामक्षेत्राच्या सुरक्षिततेची चिंता त्यांच्या हृदयांत सतत होती. त्यांनीं आपल्या समर्थ शिष्यांकडे आपली ही खंत कळविली आणि त्यांच्याकरवीं शके १६६६ मध्यें हबशांच्या अन्यायांतून सारी परशुरामभूमि मुक्त केली.

## देवस्थानची व्यवस्था

श्रीब्रह्मेंद्रस्वामी परशुरामाची जवळीक सोडून देशावर आल्यानंतरहि पेशव्यांचें लक्ष देवस्थानकडे होतेंच. अतिवृष्टीमुळें मंदिराचे घुमट गळूं लागल्यामुळें शके १६७५ मध्यें श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं स्वामींचा कारभारी जगन्नाथ चिमणाजी

याजकडून घुमटांवर चुना बसविण्याचें काम करविलें. हें काम तीन वर्षें चाललें होतें. स्वतः श्रीमंत नानासाहेब शके १६८० मध्यें श्रीपरशुरामाच्या दर्शनास आले होते. पेशव्यांकरवीं राजश्री रामचंद्र गणेश हे गडेमंडळ किल्ला घ्यावयास गेले असतां त्या कामीं त्यांना यश येईना. त्या वेळीं त्यांनीं श्रीपरशुरामास नवस केला कीं, “ किल्ला सर झाल्यास मी नित्य पूजेसाठीं चौघडा देईन. ” हा नवस सफळ झाला आणि रामचंद्र गणेशांनीं पेशव्यांना विनंती करून चौघड्याची व्यवस्था करविली. हा चौघड्यासंबंधींचा हुकूम वैशाख शुद्ध ३ ( परशुराम-जयंती ) शके १७०२ या शुभ दिवशीं राजश्री कृष्णाजी विश्वनाथ बर्वे यांजकडे आला. नंतर त्याच वर्षीच्या मार्गशीर्षांत चौघड्यासाठीं नगारखान्याची इमारत उभी केली गेली. चौघड्याच्या खर्चासाठीं १२०० रुपये इनाम चालू झालें. इ. स. १९४० सालीं पंच-कमिटीनें सहा हजार रुपये खर्चून नगारखान्याचा जीर्णोद्धार केला.

स्वामी देशावर गेल्यानंतर इ. स. १७४४ पासून पेशवाईच्या अंतापर्यंत सर्व व्यवस्था संस्थानकारकुनामार्फत चालत असे. इंग्रजी अमदानींत इ. स. १८८९ पर्यंत सहा पंचांच्या कमिटीमार्फत व्यवस्था पाहिली जात असे. पंचांची नेमणूक रत्नागिरी जिल्ह्याचा कलेक्टर करीत असे. अर्थात् अशी नेमणूक करतांना ग्रामसंमतीचा विचार केला जात असे. ही पंच-कमिटी पूर्वापार वहिवाटीप्रमाणें देवस्थानचा कारभार पहात असे.

इ. स. १८८९ मध्यें देवस्थानच्या व्यवस्थेबद्दल ग्रामस्थांत मतभेद निर्माण झाले. हे मतभेद एवढ्या विकोपाला गेले कीं, शेवटीं तें प्रकरण न्यायालयांत प्रविष्ट झालें. या प्रकरणाचा न्यायालयीन निवाडा दि. १२ फेब्रुवारी सन १८९७ मध्यें प्रकट झाला आणि त्या निवाड्यानुसार ठरलेल्या योजनेप्रमाणें देवस्थानचा

कारभार सुरू झाला. इ. स. १९१८ मध्यें या योजनेंत किरकोळ फेरफार झाले. चिपळूण कोर्टांतील दोन वकील व गांवांतील तीन सद्गृहस्थ अशा पांच पंचांच्या कमिटीमार्फत सध्यां कारभार चालू असतो. या कमिटीची नेमणूक दर पांच वर्षांनीं होते.

'मर्यादित उत्पन्नांत चांगल्या व्यवस्थेनें चालणारें देवस्थान' असा परशुरामक्षेत्राचा लौकिक आहे. देवस्थानाच्या उत्पन्नाच्या बाबी म्हणजे इनाम गांवांतील वसूल आणि चिपळूण सुभ्याकडून मिळणारी मदत. पेढें (ता. चिपळूण), आंबडस (ता. खेड), देवाचें गोठणें (ता. राजापूर) आणि टोळ (ता. माणगांव) या गांवांचें उत्पन्न : भात ४८॥ खंडी, नागली १ खंडी १६ मण, वरी १ खंडी १७ मण, पावटे ५ मण, तुरी १ खंडी व मूग ४ मण असें धान्याच्या रूपानें येतें आणि ७४५ रुपये रोख येतात. शिवाय चिपळूण सुभ्याकडून दरवर्षी १५२८ रुपये रोख मिळतात.

देवस्थानचा सेवकवर्गहि बराच आहे. कारकून, कोठीवळा, आचारी, चवरीवाला, फुलारी, गडी, पोतदार, चौघड्यावरील आठ वादक, पहारेकरी, दोन पालखीचे भोई, मशालजी, दोन अबदागीरवाले, तोफेचा गोलंदाज, परीट इत्यादि एकूण ३२ सेवक देवाच्या नित्यनैमित्तिक सेवेंत राबत असतात.

देवळांत अन्नछत्रहि चालू असतें. अन्नछत्रासाठीं स्वामींनीं बांधलेली 'भांडारघर' म्हणून स्वतंत्र इमारत आहे. त्यांत कोणी बैरागी-ब्राह्मण आल्यास त्यास आठवड्यांतून एक वेळ भोजन मिळतें. अन्नछत्राचा खर्च टोळ गांवाच्या निम्म्या इनामांतून भागविला जातो.

देवाच्या नित्य उपासनेंत तोफेचे आवाज काढण्याचा क्रम स्वामींनीं साजरा केलेल्या पहिल्या उत्सवापासून चालू आहे. रोज सकाळीं ८ वाजतां व रात्रीं ८ वाजतां तोफेचा बार करतात.

प्रत्येक वेळीं ती १ रत्तल दारू खाते. तोफेचा आवाज दहा-बारा मैलांचा परिसर दणाणून सोडतो. या तोफेला वर्षांतून एकदां 'देणें' द्यावें लागतें. तसें तें दिलें नाहीं, तर ती आवाज देणार नाहीं, अशी समजूत आहे. सध्यांची तोफ गोवळकोटकरांकडून विकत घेतलेली आहे.

## नित्यनैमित्तिक उपासना आणि उत्सव

देवाच्या नित्य-नैमित्तिक उपासनेची व उत्सवांची विवक्षित पद्धति आंखलेली आहे. देवाची नित्योपासना पहांटे ५ वाजतांच सुरू होते. पहांटे दिशांच्या मुखांवर प्रकाशाचीं स्वप्नें फुलूं लागतात आणि पक्ष्यांच्या कंठांतून प्रार्थना उमलूं लागते – अशा मंगल वेळीं देवाचा चौघडा वाजूं लागतो. त्या वेळीं पुजारी देवाला स्नान घालतात आणि पूजा-द्रव्यें वहातात. त्यानंतर सकाळीं ८ वाजण्याच्या सुमारास तोफेच्या आवाजाबरोबर देवाची धूपारती होते. नंतर दुपारीं ११ वाजण्याच्या सुमारास चौघड्यावर नौबत वाजत असतांना महानैवेद्य होतो. तिसऱ्या प्रहरीं पुजारी देवाच्या मूर्तीवर पोषाख चढवितात आणि श्रीमूर्तीला पुष्पमाळांनीं शृंगार-तात. सायंकाळीं पुनः चौघडा सुरू होतो आणि ७ वाजण्याच्या सुमारास श्रीस नैवेद्य अर्पण केला जातो. नंतर रात्रीं ८ वाजण्याच्या सुमारास देवाची पालखी मंदिर-प्रदक्षिणा करते. या पालखीच्या कार्यक्रमाच्या वेळींहि तोफ वाजते. रात्रींहि १२ वाजतां चौघडा झडतो. महत्त्वाच्या सणांच्या दिवशीं आणि प्रत्येक शुक्रवारीं प्रहरा-प्रहराला चौघडा वाजतो. मराठ्यांच्या पुरुषार्थाला नि पराक्रमाला प्रेरणा देणाऱ्या परशुरामाची पूजा तोफेच्या नि चौघड्याच्या शत्रुंजय ध्वनीनें साजरी व्हावी, हें स्वाभाविक आहे आणि औचित्यपूर्ण आहे.

येथील उत्सवांत अक्षयतृतीयेचा उत्सव मुख्य आहे. या मुख्य उत्सवाशिवाय आणखी दोन उत्सव होतात. एक भाद्रपद शुद्ध चतुर्थीचा गणेशोत्सव आणि दुसरा माघ शुद्ध षष्ठीचा मूर्ति-वर्धापनोत्सव. हा उत्सव १८० वर्षांपूर्वी सुरू झाला. शके १७०१ च्या माघ शुद्ध षष्ठीला या मंदिरांत मूर्तींची प्रतिष्ठापना झाली, म्हणून दरवर्षी माघ शुद्ध षष्ठी हा दिवस मूर्ति-वर्धापनोत्सवाचा दिवस म्हणून पाळला जातो. या दोन उत्सवांशिवाय श्रावण शुद्ध नवमीच्या दिवशीं देवस्थानाचे एक श्रेष्ठ संवर्धक श्रीब्रह्मेंद्रस्वामी यांची पुण्यतिथि होते आणि शिवरात्रीच्या दिवशींहि हजारोंची यात्रा भरते.

अक्षयतृतीया हा परशुराम-जयंतीचा उत्सव. परशुरामक्षेत्रांत हा उत्सव वैशाख शुद्ध प्रतिपदेपासून वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत तीन दिवस थाटामाटानें साजरा होतो. हजारोंच्या उपस्थितीनें साजरा होणाऱ्या या उत्सवाची मुहूर्तमेढ चैत्र वद्य ३० लाच रोवली जाते. या दिवशीं मखर तयार करून मंडप शृंगारतात. हा मंडप अत्यंत विस्तीर्ण आणि भव्य असतो. प्रतिपदेच्या दिवशीं सकाळपासून उत्सवास प्रारंभ होतो. सकाळीं श्रींना अभिषेक होतो. नंतर ९ वाजण्याच्या सुमारास श्रींना स्वरांजुळी वहाण्यासाठीं अनेक गायक-वादक मंडपांत उपस्थित होतात आणि आपल्या कलेचीं पुष्पें परशुराम-चरणीं अर्पण करतात. याच वेळीं यात्रेंतील बैरागी, साधुसंत यांना शिधा करतात. नंतर दोन प्रहरीं ब्राह्मणभोजन होतें. सायंकाळीं कीर्तनें होतात. कीर्तनाच्या वेळीं श्रींची स्वारी थाटानें मखरांत बसवितात. अभ्यस्त आणि गानकुशल कीर्तनकारांच्या रसमधुर वाणीनें [illegible]चा प्राकार भारावून जातो. रात्रीं श्रींची पालखी मिरवून [illegible] कीर्तन होतें आणि पहिल्या दिवसाचा कार्यक्रम पूर्ण हो[illegible].

द्वितीयेच्या दिवशीं सायंकाळीं जन्मोत्सव होतो. बहुशः त्या वेळीं द्वितीया संपून तृतीया लागलेली असते. दिवसभरचे कार्यक्रम पहिल्या दिवसाप्रमाणें होतात. दुपारीं सातशें-आठशें लोकांना भोजन होतें. सायंकाळीं ५ वाजण्याच्या सुमारास वार्षिक मानाच्या हरिदासांचें कीर्तन होतें आणि नंतर हजारों यात्रिकांच्या उपस्थितींत श्रींचा जन्म साजरा होतो.

तिसऱ्या दिवशीं अक्षयतृतीया. या दिवशीं मागीलप्रमाणेंच दिवसभरचा कार्यक्रम असतो. रात्रीं श्रींचा छबिना निघतो. मंदिराभोंवतीं पालखीच्या पांच प्रदक्षिणा होतात आणि याच वेळीं 'साधूंच्या परित्राणासाठीं आणि दुष्टांच्या निर्दालनासाठीं' अवतरलेल्या भार्गवरामाला पांच तोफांची स्वागत-घोषणा होते. तोफा-चौघड्याच्या साथीनें साजरा होणारा हा छबिन्याचा कार्यक्रम उरकल्यावर रात्रीं २ च्या सुमारास उरलेल्या हरिदासांची कीर्तन-फेरी होते. पहांटेच्या वेळीं कीर्तनें संपून 'ललीत' सुरू होतें. या वेळीं शेंकडों दीपज्योतींनीं मंदिराचा प्राकार उजळून जातो. प्रभु-संकीर्तनानें रंगलेली, दीपज्योतींनीं प्रकाशलेली आणि नवस्वप्नांनीं सर्वांगा फुलून आलेली ती अमृतमय पहांट परशुरामाच्या पद-स्पर्शासाठीं जणुं आतुर झालेली असते. त्या 'उज्ज्वल' पहांटेच्या वातावरणांत यात्रिकांचीं मनेंहि ज्वलन्त श्रद्धेच्या सहस्र ज्योतींनीं उजळून जातात – हृदयांत दाटलेला भावावेग आनंदजळाच्या रूपानें ओसंडूं लागतो आणि जन्मोत्सवाचें संगीत-गान गातांना भार्गवरामाचें अद्भुत लीलाचरित्र दृष्टीपुढें नाचूं लागतें.

* * *

…ही व्हावी, हे स्वा…

REFBK-0014292
माद्र१

अन्यावर पुनः

● ● सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : संच ३ रा :

*महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें*

**गोमंतकाची शांति-शक्ति** * १३ *

कवळयाची शांतादुर्गा : वा. ल. वझे

**पार्वतीपते ! हर हर महादेव** * १४ *

गोमंतकाचा श्रीमंगेश : वा. ल. वझे

**'डाकिन्याम् भीमशंकरम्'** * १५ *

भीमाशंकर क्षेत्र : शं. ना. जोशी

**दलितांचा कैवारी भार्गवराम** * १६ *

कोंकणचें परशुराम क्षेत्र : स. आ. जोगळेकर

**छत्रपतींचें कुलदैवत** * १७ *

शिखर शिंगणापूर : चिं. ग. कर्वे

**श्रीगुरूंचें गंधर्वपूर** * १८ *

श्रीक्षेत्र गाणगापूर : रा. चिं. ढेरे

...अशीं आणखी कितीतरी पुस्तकें आम्हीं आपल्या हातीं देणार आहोंत. त्यापैकीं वरील सहाचा हा तिसरा संच.

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

**प्रत्येक पुस्तकाची किंमत ६२ नये पैसे**

**सहा पुस्तकांची संच-पेटी : रुपये ३·७२**

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.**

३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २.